Annexure-V1

**प्रकल्प प्रवर्तक मे. लिग्नोप्यूरा अ‍ॅग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक ई-१४, अतिरिक्त कडेगाव-शिवाजीनगर एम. आय. डी. सी. तालुका-कडेगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र-४१५३०४. यांचा अंदाजित उत्पादन क्षमता जैवएथेनॉल-१.८५ घन मिटर प्रतिदिन, प्रस्तावित डेमो स्केल २ जी इंटिग्रेटेड जैवएथेनॉल प्रकल्प उभारणीसाठी जाहीर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. लिग्नोप्यूरा अ‍ॅग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक ई-१४, अतिरिक्त कडेगाव-शिवाजीनगर एम. आय. डी. सी. तालुका-कडेगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र-४१५३०४. यांचा अंदाजित उत्पादन क्षमता जैवएथेनॉल-१.८५ घन मिटर प्रतिदिन, प्रस्तावित डेमो स्केल २ जी इंटिग्रेटेड जैवएथेनॉल प्रकल्प उभारणी बाबतची जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ०८ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थान - मे. लिग्नोप्यूरा अ‍ॅग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक ई-१४, अतिरिक्त कडेगाव-शिवाजीनगर एम. आय. डी. सी. तालुका-कडेगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र-४१५३०४. येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. विद्यासागर वि. किल्लेदार, आयोजक, पर्यावरण विषयक जनसुनावणी तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी, आज जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मन:पुर्वक स्वागत केले. जनसुनावणी समितीचे अध्यक्ष, सदस्य यांचेही स्वागत केले. पुढे म्हणाले की, आज आपण मे. लिग्नोप्यूरा अ‍ॅग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक ई - 14, अतिरिक्त कडेगाव शिवाजीनगर एम.आय.डी.सी. तालुका- कडेगाव, जि.सांगली महाराष्ट्र यांचा अंदाजित उत्पादन क्षमता जैवएथेनॉल - 1.85 घन मिटर प्रतिदिन, प्रस्तावित डेमो स्केल 2 जी इंटिग्रेटेड जैवएथेनॉल प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीसाठी आपण उपस्थित आहोत.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ व आजतागायत सुधारित अधिसूचना नुसार आजची जनसुनावणी घेण्यात येत आहे.

यासाठी उद्योजकाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय मुंबई येथे दि. २४ /१०/२०२४ रोजी प्रस्ताव सादर केलेला होता. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांचे मार्फत यांनी उद्योजकास/व्यवस्थापनास काही अटी व शर्ती घालून दि. ०६ /०८ /२०२४ रोजी टी.ओ.आर. मंजूर केलेला आहे व प्रस्तावित प्रकल्पाचा

पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार उद्योजकाने प्रारुप अहवाल तयार केलेला असून शासनास सादर केला आहे.

त्यानंतर मा. जिल्हादंडाधिकारी, सांगली यांनी दिनांक ०८/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता जाहिर जनसुनावणी घेण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय, सांगली यांचेमार्फत दिनांक ०८/१२/२०२४ रोजीच्या अनुक्रमे **“ दैनिक सकाळ ”** या मराठी व **“ टाईम्स ऑफ इंडिया ”** या इंग्रजी वृत्त पत्रामध्ये जाहिर सुनावणीची सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तदनंतर मंडळाचे मुख्यालय मुंबई यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र. इंग्रजी इ- २/२०२४, पत्र क्र. २४१२२६- एफटीएस ००४२, दिनांक २६/१२/२०२४ अन्वये सदरच्या पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या खालील प्रमाणे समिती गठीत केली. त्याप्रमाणे उपस्थित समिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | श्री. दादासाहेब कांबळे,<br>प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी सांगली,<br>प्रतिनिधी जिल्हादंडाधिकारी, सांगली | अध्यक्ष |
| 2) | श्री. जयवंत शं. हजारे,<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर | सदस्य |
| 3) | श्री. विद्यासागर वि. किल्लेदार,<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सांगली | आयोजक |

सदर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेला प्रारुप प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती खालील प्रमाणे अधिसूचित कार्यालयामध्ये उपलब्ध करण्यात आलेले होते-

१) जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली;

२) जिल्हा उदयोग केंद्र, सांगली;

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली;

४) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, कोल्हापूर,

५) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४०००१;

६) मा. उपसचिव, पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादामा कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

७) मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईट,तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.

८) मुख्याधिकारी, कडेगाव नगरपंचायत,कडेगाव,

९) तहसिलदार, तहसिल कार्यालय, कडेगाव.

१०) ग्रामपंचायत कार्यालय:- सुर्ली, ता. कराड, जि.सातारा, शिवाजीनगर, खंबाळे औंध, रेणुशेवाडी, नेर्ली, विहापूर, निमसोड, ता. कडेगाव, जि. सांगली. इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या.

११) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळ.

तसेच आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सांगली या कार्यालयाकडे उपरोक्त विभागांमार्फत तसेच थेट कार्यालयात एकही सूचना/आक्षेप किंवा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

जनतेच्या जर काही सुचना, टिका-टिप्पणी असतील तर त्या आपण लेखी किंवा तोंडी स्वरुपात जनसुनावणी दरम्यान देवू शकता त्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेतली जाईल.

या जनसुनावणीचा उद्देश जनतेस या प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाय योजना तसेच प्रकल्पासंदर्भात जनतेच्या "टिका-टिप्पणी, तक्रारी, सूचनांची" नोंद घेणे हा आहे. तसेच प्राप्त झालेल्या टिका-टिप्पणी सूचना यांच्या नोंदी घेवून त्या इतिवृत्तासह पर्यावरण , वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. तसेच प्राप्त झालेल्या टिका-टिप्पणी, सूचना बाबतचा खुलासा देण्याबाबत व जन सामान्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश मा. अध्यक्ष यांनी उद्योजकांस दयावेत. ही जनसुनावणी समिती केवळ जनतेच्या पर्यावरण विषयक तक्रारी, सूचनांची नोंद घेणार असून प्रस्तावित प्रकल्प उभारणी बाबत कोणतेही निर्णय ही समिती घेणार नाही.

सर्व प्रथम आयोजक यांनी आजच्या जनसुनावणीचे अध्यक्ष श्री. दादासाहेब कांबळे, प्रभारी अप्पर जिल्हादंडाधिकारी सांगली यांना आजची जनसुनावणी सुरु करण्यास परवानगी दयावी अशी विनंती केली. प्रथम या प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी माहिती सादर करावी व त्यानंतर उपस्थित जनतेने आपले पूर्ण नाव, गाव सांगून प्रकल्पाविषयी केवळ पर्यावरण विषय संदर्भातील टिका-टिप्पणी,

सूचना मांडाव्यात. त्या रेकॉर्डींग करुन त्यांची नोंद घेवून इतिवृत्त शासनास पाठविले जाईल.

आयोजक यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांना सूचना दिल्या की, त्यांनी प्रथम प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती सादर करावी.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) स्लाईड शोव्दारे सादरीकरण केले. यामध्ये प्रकल्पाची आवश्यकता आणि समर्थन, प्रकल्पस्थ दर्शविणारा नकाशा, प्रकल्पाचे उपग्रहीय छायाचित्र, प्रकल्पाचे छायाचित्र, प्रकल्पाचा आराखडा, प्रकल्प क्षेत्रफळाचे वर्गीकरण, प्रकल्पाचे संक्षिप्त साराश, उत्पादन प्रक्रिया, उत्पादनाची तपशिलवार माहिती, पाणी आवश्यकता अंदाजपत्र, प्रकल्पस्थळ निवड गुणवत्ता तालीका, स्थानिक पर्यावरणाचा तपशिल व परिसराची माहिती, १० कि. मी. त्रिजेचे अध्ययन क्षेत्र, सभोवतालच्या आधारभूत पर्यावरण विषयक माहिती, प्रकल्पाचे सभोवताल पर्यावरण विषयक माहिती, आधाररेखारुप पर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण, प्रकल्पस्थळापासुन १० कि. मी. त्रिजेतील परिक्षणाची स्थाने, वायु पर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील भूजल पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील भूपृष्ठावरील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील ध्वनी तिव्रता, अध्ययन क्षेत्रातील जैवपर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील सामाजिक व आर्थिक पर्यावरण, पर्यावरणावरील परिणामाचा सारांश आणि शमन उपाययोजना, घातक घन कचरा व्यवस्थापन, विनाघातक घन कचरा व्यवस्थापन, हरितपटयांचा विकास/वृक्षारोपण, व्यवसायीक निरीक्षण कार्यक्रमाचा तपशिल, पर्यावरण व्यवस्थापन योजनेवरील खर्चाची तरतुद (बांधकाम टप्पा), पर्यावरण व्यवस्थापन योजनेवरील खर्चाची तरतुद (परिचलन टप्पा), व्यवसायीक पर्यावरण जबाबदारी तपशिल, पर्यावरण व्यवस्थापन योजना, प्रस्तावित प्रकल्पाचा सकारात्मक प्रभाव इ. बाबतची माहिती स्लाईडव्दारे सादर केली.

तदनंतर संयोजक यांनी उपस्थित नागरीकांना आपल्या सुचना, आक्षेप व हरकती नोंदवावेत असे आवाहन केले व सुचना, आक्षेप नोंदविणारे यांनी प्रथम आपले नांव व गावाचे नांव सांगण्यात यावे असे सांगीतले. त्यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी योग्य ते उत्तर देण्याचा प्रयत्न करतील. याव्यतिरिक्त प्रकल्पाबाबत लेखी निवेदन असतील तेही यावेळी दयावेत अशी विनंती केली.

मा. अध्यक्ष यांनी सांगीतले की, आपण फक्त पर्यावरण विषयकच प्रश्न मांडावेत. तसेच एकदा विचारलेला प्रश्न परत विचारु नये.

**<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>**

**१. <u>श्री. तानाजी शामराव शिंदे, राहणार- कडेगांव, ता-कडेगांव, जि-सांगली.</u>**

**प्रश्न** — अत्यंत चांगल्या प्रकारे प्रकल्पाची माहिती सांगीतली आहे, माझा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पाचा शेतकऱ्यांना काय फायदा होणार, हा प्रकल्प जर विस्तृतपणे सांगीतले तर बरे होईल.

**उत्तर**— प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की, हा प्रकल्प उसापासुन निघाणा-या बगॅसवर आधारीत असुन सद्यस्थित बगॅस हे बॉयलरमध्ये जाळण्यासाठी वापरतात त्याऐवजी त्यापासुन इथेनॉलचे उत्पादन केलेस शेतक-याच्या ऊसाला सद्यपरिस्थितीपेक्षा निश्चितच सुधारीत दर मिळेल.

**२. <u>श्री. संभाजी पोपट यादव, माजी संरपच, कोतवडे. ता-कडेगांव, जि-सांगली.</u>**

**प्रश्न** — हा जो प्रकल्प होणार आहे त्यापासुन प्रदुषण होणार आहे काय?

**उत्तर** — प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सागीतले की, हवा आणि पाणी प्रदुषण होवू नये म्हणून अत्याधुनिक झिरो लिक्वीड डिस्चार्ज आणि बॉयलरमध्ये सीएनजी गॅस वापरण्यात येईल, पर्यावरण संवर्धनासाठी प्रकल्प धारकाने ३ कोटी ९५ लाख रुपयेची तरतुद केलेली आहे. ज्यामुळे हवेचे व पाण्याचे प्रदुषण होणार नाही.

**३. <u>श्री. प्रमोद मांडवे, राहणार-शिवाजीनगर, ता-कडेगांव, जि-सांगली.</u>**

**प्रश्न** — प्रथम त्यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या व एक दोन सुचना आहेत असे नमुद केले. प्रकल्पात जे रोजगार निर्माण होणार आहेत त्यामध्ये प्रथमत: प्रकल्पग्रस्त यांना प्राधाम्य दयावेत नंतर स्थानिकांना व नंतर इतर लोकांना अश्या तीन विभागात विभागणी करावी असे सांगीतले. दुसरी गोष्ट बगॅस हा कच्चामाल म्हणून वापरणार आहात की तो थेट कारखान्यातून आणणार आहात की इथे उसापासुन निर्मीती करणार आहात.

**उत्तर** — प्रकल्पाचे तांत्रिकी सल्लागार यांनी सांगीतले की, प्रकल्पासाठी लागणारा बगॅस हा कारखान्यातुन आणणार आहे, कारण उसापासुन बगॅस

बनविण्यासाठी जी यंत्रणा लागते ती मोठी यंत्रणा आम्ही आमच्या प्रकल्पात बसविणार नाही. तसेच प्रकल्पात जी रोजगार निर्मीती होणार आहे त्यामध्ये स्थानिकानाच प्रथम प्राधाम्य देण्यात येईल असे अहवालातसुध्दा सादर केले आहे. तसेच पकल्पास प्रतीदिन ५ टनाचीच बगॅसची आवश्यकता आहे ती कारखान्याशी सलग्न राहून बगॅस घेणार आहे. सध्या प्रकल्प हा प्रयोगिक तत्वावर उभारण्यात येणार आहे भविष्यात जर प्रकल्प मोठया स्वरुपात उभारला जाईल तेव्हा बगॅसची प्रक्रिया केली जाईल. प्रकल्प धारकाने हे जाणुन घेतले आहे की कडेगांव एमआयडीसी मध्ये बरेच प्रकल्प बंद आहेत आणि या प्रकल्पातुन जी रोजगार निर्मीती होईल त्याचा स्थानिकांना जास्तीत-जास्त कसा फायदा होईल याची काळजी घेण्यात येईल.

**४ — श्री. प्रमोद मांडवे, राहणार-शिवाजीनगर, ता-कडेगांव, जि-सांगली.**

**प्रश्न** - **सीएसआर उपक्रम राबविणार आहेत तो आजुबाजुच्या गावात** जसे शाळा, ग्रामपंचायत याठिकाणी करणे ऐवजी एमआयडीसी मध्ये खर्च करावा, तसेच प्रत्येक ठिकाणी कडेगांव एमआयडीसी ऐवजी कडेगांव शिवाजीनगर-एमआयडीसी अशी नोंद करावी.

**उत्तर** — प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सागीतले की सदर प्रकल्पाची नोंद आम्ही कडेगांव एमआयडीसी ऐवजी कडेगांव-शिवाजीनगर एमआयडीसी असे करु. तसेच सीएसआर खर्च हा कंपनी ॲक्टनुसार शुध्द नफयाच्या दोन टक्के केला जातो तो प्रकल्प चालु झाल्यानंतर होतो. सद्यपरिस्थतीत आम्ही सीईआर साठी ५३ लाखाचा खर्च योजिला आहे तो बांधकाम टप्पापासुन उद्योग चालू होण्याच्या आधी खर्च करण्यात येईल आणि पुढे सीएसआर हा आजुबाजुच्या गावांकरीताच खर्च करण्यात येईल.

**५. श्री. अक्कलय्याह डोटी, अध्यक्ष, मे. प्रगती पर्यावरण संस्था, नलगोंडा. (तेलंगन राज्य)**

**प्रश्न** - सदरील प्रकल्पास समर्थन दिले व काही सुचना दिल्या जसे वाचनालय, आरोग्य शिबीर इत्यादी गावक-यासाठी उपक्रम राबविण्यात यावेत व यासंबधीचे निवेदन जमा केले.

**६. श्री. धनंजय चंद्रसेन देशमुख, नगराध्यक्ष, कडेगांव नगरपंचायत कडेगांव.**

**प्रश्न -** सीएसआर फंड हा फक्त शिवाजीनगर साठी न वापरता तो शिवाजीनगर आणि कडेगांव या दोन्ही गावासाठी वापरण्यात याव्यात अशी सूचना केली.

**उत्तर —** प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की, सीएसआर प्रकल्प चालु झाल्यानंतर आजुबाजुच्या गावासाठीच वापरण्यात येणार आहे. सध्या सीईआर हे बांधकामापासुन प्रकल्प चालु होण्यापर्यंत गावामध्येच खर्च होणार आहे.

**७. श्री. हेमंत हणमंतराव व्यास, राहणार- कडेगांव, ता-कडेगांव, जि-सांगली.**

**प्रश्न -** या नियोजित प्रकल्पास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणखीन जागा उलब्ध करुन देणार आहेत का?

**उत्तर -** यावर मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी यांनी सांगीतले की, जागेचा प्रश्न हा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आखत्यारीत येत नाही. उद्योगास नवीन जागा पाहिजे असल्यास त्यांनी प्रादेशिक कार्यालय, एमआयडीसी यांचेकडे विनंती करावी.

\- यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की प्रस्तावित प्रकल्प हा सध्या प्रायोगिक तत्वावर आहे आणि सध्या उपलब्ध असलेली ८००० स्के. मिटर मध्येच करणार आहे. भविष्यात जर प्रकल्पाचे विस्तारीकरण झाले तर एमआयडीसी कडून अतिरक्ति जागा घेणार, सध्या या प्रकल्पास जास्तीची जागा लागणार नाही.

**८. श्री. आशीष अशोक कराडकर, रा.-कडेगांव, ता-कडेगांव, जि-सांगली.**

**प्रश्न -** सदर प्रकल्पामध्ये बगॅस व पाणी लागणार आहे तसेच पकल्पामधून निर्माण होणारे सांडपाण्यावर काय व्यवस्था करणार आहात.

**उत्तर-** यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की, प्रकल्पासाठी लागणारा बगॅस हा जवळच्या साखर कारखान्याकडून व पाणी आम्ही एमआयडीसी कडून घेणार आहोत. प्रकल्पाला एकूण ६३ घनमिटर पाण्याची गरज असुन एमआयडीसी कडून फक्त २६ घनमिटर इतके पाणी घेणार आहोत. व उर्वरीत प्रक्रिया करुन शुध्द केलेले पाणी वापरण्यात येणार आहे. सदर प्रकल्प हा आधुनिक झिरो लिक्वीड डिस्चार्ज यंत्रणा राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचे प्रदुषण होणार नाही.

**९. श्री. सुहास कराडकर, राहणार-कडेगांव, तालुका-कडेगांव, जिल्हा-सांगली.**

**प्रश्न -** आपल्या या प्रकल्पासाठी शुभेच्छा, या प्रकल्पात किती वृक्षारोपण करणार आहात आणि कुठे-कुठे करणार आहात.

**उत्तर -** यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की आमच्या प्रकल्पामध्ये आम्ही ३३ टक्के जागा वृक्षारोपणासाठी राखीत ठेवलेली आहे. यामध्ये ९६५ झाडे लावणार आहोत या व्यतिरिक्त सीईआर ॲक्टीव्हीमध्ये रस्त्याच्या कडेला, गावामध्ये व जिथे कुठे पडिक जमिन असेल तेथे झाडे लावण्यात येतील.

**१०. तानाजी शामराव शिंदे, रा-कडेगांव, तालुका-कडेगांव, जि-सांगली.**

**प्रश्न -** जिथे-जिथे आपण झाडे लावणार आहेत त्याठिकाण स्थानिक प्रजातीची झाडे लावा उदा. वड , पिंपळ, औदुबर, लिंब अश्या प्रकारची मोठी झाडे लावावीत ज्यातुन जास्तीत जास्त ऑक्सीजनची निर्मीती होती व ज्याचा आयुर्वेदामध्येसुध्दा महत्व आहे. तुम्ही इंग्रजी झाडे लावू नका ज्यावर पक्षीसुध्दा घरटे बांधत नाहीत.

**उत्तर -** यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की, जो हरितपटटा निर्माण करणार आहोत त्यामध्ये केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसारच झाडे लावण्यात येतील, आम्हीसुध्दा अटीप्रमाणे कुठलेही शोभेची झाडे लावणार नाही. आमच्या वृक्षारोपण कार्यक्रमात स्थानिक प्रजातीची मोठी झाडे लावू ज्यामध्ये वड, पिंपळ, आंबा, औदुंबर या झाडाचा समावे असेल ज्यावर पक्षासुध्दा घरटी करु शकतात व जास्तीत जास्त ऑक्सीजन निर्मीत होण्यास मदत होते.

**११. सुनिल सुधाकर पवार, रा-शिवाजीनगर, तालुका-कडेगांव, जिल्हा-सांगली.**

प्रश्न - बायोइथेनॉल बददल सविस्तर माहिती दयावी.

उत्तर - यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी माहिती दिली की, २ जी इथेनॉल म्हणजे सेकंड जनरेशन इथेनॉल सदयपरिस्थितीत मोर्लेसिस पासुन इथेनॉल बनविण्यात येतो पण आम्ही जैविक कचऱ्यापासून इथेनॉल बनवित आहोत म्हणून ते २ जी इथेनॉल आणि या इथेनॉलला पेट्रोलमध्ये मिक्स करुन वापरतात म्हणून याला बायोइथोनॉल म्हणतात.

**१२. श्री. जयवंत शं. हजारे, पर्यावरण विषयक लोक सुनावणी समिती सदस्य.**

प्रश्न - मोलॅसिस पासुन इथेनॉल बनविताना कन्व्हर्जन कॉस्ट किती आहे आणि बगॅसपासुन इथेनॉल बनविताना कन्व्हर्जन कॉस्ट किती आहे. तुम्ही आता खर्च नाही सांगीतला तरी चालेल पर्सटेंज ऑफ कन्व्हर्जन कॉस्ट किती आहे.

उत्तर - यावर प्रकल्प धारकांनी उत्तर दिले की, हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर असल्याने बगॅस पासुन इथेनॉल कन्व्हर्जन कॉस्ट ४५ ते ५० रुपये प्रतिलिटर प्रमाणे आहे. पुढे तो कमर्शिएल म्हणजे १०० किलोलिटर प्रतिदिन पेक्षा जास्तीचे असेल त्यामुळे अतिरिक्त उत्पादनामुळे ऑपरेटिंग कॉस्ट आणखीन कमी होणे आपेक्षित आहे. सदरील कॉस्ट कमी होण्याचे कारण म्हणजे बगॅसची कॉस्ट सध्या ३.०० रुपये प्रतिकिलो व मोलॅसिसची कॉस्ट ३०.०० ते ४०.०० रुपये प्रतिकिलो आहे त्यामुळे मोलॅसिसपासुन बायोइथेनॉलची कॉस्ट ५५ ते ६० रुपये जाते.

- पुढे समिती सदस्य श्री. जयवंत शं. हजारे यांनी विचारले की, लिग्नीनचे विल्हेवाट कशी लावणार आहात.
- यावर प्रकल्प धारकांनी सांगीतले की लिग्नीन आम्ही डिसपोज नाही करणार आहे तो आम्ही प्रोडक्ट म्हणून मार्केटमध्ये विकणार आहोत. लिग्नीनचे भरपूर फायदे आहेत लिग्नीन हा चिकट पदार्थ आहे तो बायंडर केमिकल म्हणून फॉड्रीमध्ये वापरण्यात येतो तसेच ग्राफिन,कार्बन फायबर बनविण्यासाठी वापरतो. सध्यामध्ये हया प्रकल्पातुन ८०० किलोप्रतिदिन लिग्नीनचे उत्पादन होणार आहे ते फॉड्रीकेमिकलमध्ये फिनॉल रिप्लेसमेंट म्हणून वापरणार आहोत. फॉड्रीमध्ये फिनॉल वापरल्याने जे प्रदुषण होते ते लिग्नीन वापरात आणल्यास आरोग्यावर परिणाम होणार नाही.
- पुढे समिती सदस्य, श्री. जयवंत शं. हजारे यांनी सागीतले की, जो प्रकल्पामधून स्लज निघणार आहे तो बायोकंपोस्ट करण्याऐवजी बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरु शकता का.
- यावर प्रकल्प धारकांनी सांगीतले की, स्लज इंधनम्हणून वापरता येईल पण त्या स्लजमध्ये ५० ते ६० टक्के पाणी असते ते ड्राय करण्यासाठी इव्हॉपरेशन कॉस्ट वाढणार त्याऐवजी स्लजमध्ये इस्ट एंझाईम हे बायोकल्चर असल्यामुळे ते बायोकंपोस्ट म्हणून शेतीस जास्तीचा फायदा होईल.

- पुढे समिती सदस्य, श्री. जयवंत शं. हजारे यांनी सागीतले की, साखर कारखान्याप्रमाणे बगॅस को-जनमध्ये बॉयलरमध्ये इंधन म्हणून वापरतात. त्यामुळे तो कारखान्यामध्ये रिसायकल होतो. तसा या प्रकल्पातुन निघणारा स्लज ड्राय करुन तो इंधन म्हणून वापरला तर तो प्रकल्पामध्येच रिसायकल होईल का.
- यावर प्रकल्प धारकांनी सांगीतले की, आपली सुचना ही पुढे प्रकल्प चालु झाल्यानंतर योग्य ती उपाय योजना करुन कशी अंमलबजावणी करता येईल याचा विचार केला जाईल. सध्याचा प्रकल्प हा प्रायोगिक तत्वावर आहे. त्यामुळे आपल्या सुचनेचा पुढे विचार करण्यात येईल.
- यावर श्री. धनंजय चंद्रसेन देशमुख, नगराध्यक्ष, कडेगांव नगर पंचायत, कडेगांव यांनी असे सुचविले की, त्याचा इंधन म्हणून वापर करण्यापेक्षा बायोकंपोस्ट म्हणून शेतीसाठी वापरले तर शेतक-यांना त्याचा जास्तीचा फायदा होईल.

**१३. मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक समिती यांनी विचारले की, प्रकल्पातुन**

प्रश्न - १.३७ टन प्रतिदिन इतका कार्बनडॉय ऑक्साईड निर्माण होणार आहे. त्याचा वापर कसा करणार हे सोप्यात-सोप्या भाषेत सर्वांना सांगा.

उत्तर - यावर प्रकल्प धारकांनी उत्तर दिले की, प्रकल्पातुन निघणारा कार्बनडाय ऑक्साईड ग्रीन सीओटू असुन तो शितपेयामध्ये वापरता येतो. प्रकल्पामधून निर्माण होणारा सीओटु थेट हवेत सोडला जाणार नाही त्याचे बॉटलिंग प्लॅटमध्ये प्रक्रिया करुन मार्केटमध्ये विकता येतो. सीओटू हा कुलिंग एजंट म्हणून वापरतात.

त्यानंतर मा. अध्यक्ष महोदय यांनी सांगीतले की याठिकाणी उपस्थित ग्रामस्थ, एनजीओ, गावकरी काही पदाधिकारी यांच्या काही सुचना असतील तर मांडू शकता किंवा लेखी स्वरुपात जमा करु शकता.

**१४. श्री. सुहास शिवाजी चोबे. रा-कडेगांव, ता-कडेगांव,जिल्हा-सांगली.**

प्रश्न - २० वर्षापूर्वी या ठिकाणी एमआयडीसी आली लोकांनी मोठया उत्साहाने जमिनी दिल्या पण एमआयडीसीचा काही विकास झाला नाही. ज्या लोकांनी जमिनी दिल्या ते पत्र्याच्या शेडमध्ये राहतात आणि ज्यांनी जमिनी नाही दिल्या ते स्लॅबच्या घरामध्ये राहतात. माझा प्रश्न असा आहे की, या

इथेनॉल प्रकल्पामुळे काय प्रदुषण होणार व जवळपासच्या भागामध्ये काय परिणाम होणार. आणि या प्रकल्पाचा जास्तीत जास्त फायदा स्थानिक लोकांना व्हावा ज्यांची जमिनी गेल्या आहेत.

उत्तर - यावर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगीतले की, प्रकल्पाचे नियोजन हवा व पाण्याचे प्रदुषण होवू नये यासाठी योग्य ती उपाय योजना करुन अंमलबजावणी करण्यात येईल. हवेचे प्रदुषण होवू नये प्रकल्पात इंधन म्हणून सीएनजी गॅस जे ग्रीन फयूएल संबोधले जाते ते येथे वापरणार आहोत. तसेच पाणी प्रदुषण होवू नये म्हणून झिरो लिक्वीड डिस्चार्ज ही संकलप्ना प्रकल्पात राबविण्यात येणार आहे. प्रकल्पात पर्यावरण संवर्धनासाठी ३.९५ कोटी म्हणजे साधारण ४.०० कोटी ची तरतुद केली आहे त्यापैकी १.५० कोटी पाणी प्रदुषण होवू नये झिरो लिक्वीड डिस्चार्ज ही सयंत्रणा बसविण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात प्रामुख्याने स्थानिक लोकांना म्हणजे शिवाजीनगर व कडेगांव येथील लोकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगामध्ये प्राधाम्य देण्यात येईल त्यामध्ये कुशल व अकुशल कामगारांचा समावेश असेल.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी श्री. विद्यासागर वि. किल्लेदार यांनी मे. लिग्नोप्यूरा ॲग्रोटेक प्रा. लि या प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची प्रक्रिया पार पाडली असुन स्थानिक लोकांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्या खरोखरच चांगल्या सुचना आहेत. उपस्थित केलेल्या सूचनांची प्रकल्प धारकांनी अंमलबजावणी करावी असे सूचित केले. तसेच जास्तीत जास्त लोकांना रोजगार दयावा, प्रकल्पामुळे कुठलेही प्रदुषण होणार नाही याची योग्य ती खबरदारी घ्यावी, प्रकल्पामध्ये प्रस्तावित हवा प्रदुषण आणि पाणी प्रदुषणाच्या नियंत्रण बाबतचे आवश्यक ती सयंत्रणा बसवावी. आयोजक यांनी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना व्यासपिठावरील उपस्थित माननीय अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, माननीय सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, शासकीय अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत असलेले सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले. तसेच आयोजक यांनी बैठकीस मदत करणा-या महसुल व पोलिस प्रशासनाचेही आभार मानले आणि मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी १२.२० वाजता सुरू होऊन दुपारी १.४० वाजता संपन्न झाली.

**( विद्यासागर वि. किल्लेदार )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

**( जयवंत शं. हजारे )**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**( श्री. दादासाहेब कांबळे )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा अपर जिल्हा दंडाधिकारी , सांगली.